- कृषिमालाची वाहतूक व पुरवठा यंत्रणा (स्थानिक, आंतरदेशीय)
- टर्मिनॉलॉजीज, UCPDC, बॅंकींग प्रक्रिया, पेमेंट रिस्क
- निर्यातदारांसाठी RKVY, APEDA, MEIS, शासनाच्या योजना
- निर्यातीसाठी प्रमाणपत्रे (GAP, Human Consumption etc.)
- सुविधा केंद्र गरज (IFC,VHT,HWIT,VPF,PC,CS,RC)
- फळ भाजीपाल्यावर विशेष प्रक्रिया पद्धती
- करार शेती व पणन कायद्यातील बदलामुळे पणन संधी

**महाराष्ट्र राज्याचे कृषि निर्यात धोरण तयार करणेबाबत कामकाज:**

भारत देश अन्नधान्य, दुध, साखर, फळे आणि भाज्या, मसाले पदार्थ इ. उत्पादनांमध्ये जगात अग्रगण्य उत्पादक देश आहे. केंद्र सरकारने सन २०२२ पर्यंत शेतक-यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे धोरण जाहीर केले आहे. या उद्दीष्टपूर्ती करतांना कृषिमालाची निर्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावणार आहे.

महाराष्ट्र राज्य हे कृषि निर्यातीच्या दृष्टीकोनातून देशातील महत्वाचे राज्य असून निर्यातीमध्ये राज्यात उत्पादित होणाऱ्या कृषी मालाचा वाटा मोठा आहे. देशातील इतर राज्यांमध्येही कृषि निर्यातीच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात कामकाज होत आहे. तथापि महाराष्ट्रातून होणारी निर्यात वाढत रहावी यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. केंद्र शासनाच्या कृषि निर्यात धोरणामध्ये राज्य शासनाचा सक्रिय सहभाग असावा असे नमुद केले आहे. राज्यामध्ये कृषि निर्यात धोरण राबविणेकरिता केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची नोडल एजन्सी म्हणुन नियुक्ती केली आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने राज्याचे स्वतंत्र कृषि निर्यात धोरण तयार करुन शासनास सादर केलेले आहे. सदर कृषि निर्यात धोरणा अंतर्गत क्लस्टरनिहाय प्रशिक्षण कार्यक्रम, निर्यातवृद्धी होणेकरिता विवीध स्तरावरील अडी-अडचणी दुर करणेकामी शेतकरी, उत्पादकांच्या सहकारी संस्था, उत्पादकांचे संघ, शेतकरी उत्पादक कंपन्या, निर्यातदार आणि शासकीय यंत्रणेसह संबंधितांच्या बैठकांचे आयोजन, बायर सेलर मीटचे आयोजन करण्यात येत आहे.

# प्रकल्प विभाग

## १) सल्ला सेवा

पणन मंडळाकडून राज्यातील बाजार समित्यांना व सहकारी संस्थांना गेल्या काही वर्षात प्रकल्प सल्ला पुरविण्यात आला. या उपक्रमास मिळालेला प्रतिसाद लक्षात घेवून सर्व सोयींनीयुक्त अशा प्रकल्प सल्ला विभागाची २३ जुलै २००३ रोजी स्थापना झाली.

या विभागामार्फत पणन मंडळामार्फत उभारण्यात येणा-या सुविधांचे प्रकल्प अहवाल अनुदानाकरिता तयार करुन रा.कृ.वि.योजना व अपेडा यांना सादर करण्यात येतात. केंद्र शासनाच्या एकात्मिक कृषि पणन योजनेच्या कृषि पणन सुविधा या उपयोजनेंतर्गत पणन मंडळाकडे प्राप्त बाजार समित्यांचे प्रस्ताव योजनेच्या निकषाप्रमाणे तपासण्यात येतात.

आजपर्यंत प्रकल्प सल्ला विभाग सद्यस्थितीत कृषि प्रक्रिया प्रकल्पांना सल्ला सेवा पुरवित आहे. अशा सर्व प्रकल्पाची एकूण अदांजित किंमत सुमारे रु. २५० कोटी आहे. तसेच

## २) फिरता निधी योजना प्रस्ताव.

प्रकल्प विभागामार्फत फिरता निधी योजनेत करणेसाठी खालीलप्रमाणे दोन पात्र प्रस्तावांना फिरता निधी वितरीत करणेत आला आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रकल्प | प्रकल्प किंमत (रु. लाख) |
|---|---|---|---|
| १ | यशवंती ॲग्रो प्रोड्युसर कंपनी, ऐतवडे खु. ता. वाळवा, जि. सांगली | टोमॅटो ट्रेडींग प्रकल्प | ५.०० |
| २ | श्री महागणपती ॲग्रो प्रोड्युसर कंपनी लि. ठाणापुडे ता. वाळवा, जि. सांगली | बेबी कॉर्न खरेदी विक्री | ५.०० |

## ३) Directorate of Marketing & Inspection, Mumbai यांना AMI sub scheme ISAM योजनेअंतर्गत २५ टक्के अनुदानासाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर.

केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत पणन मंडळाकडे प्राप्त खालील बाजार समित्यांचे प्रस्ताव योजनेच्या निकषाप्रमाणे तपासुन २५ टक्के अनुदाना मंजुरीकरीता पुढील कार्यवाहीसाठी कृषि विपणन सल्लागार, विपणन व निरिक्षण संचानालनालय, मुंबई यांना पाठविणेत आले;

| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | प्रकल्प | प्रकल्प किंमत (रु. लाख) |
|---|---|---|---|
| १ | संगमनेर | उप बाजार वडगाव पान येथे विविध विकास कामे करणे. | १३४१.८८ |
| २ | दोंडाईचा | मुख्य बाजार येथे शेड बांधकाम करणे. | ९१.१२ |
| ३ | दुधनी | उप बाजार नागणसूर येथे विविध विकाम कामे करणे. | ६२५.५० |

# ड) अभियांत्रिकी विभाग

कृषी उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या बाजार आवारातील विविध विकास कामे / बांधकामे जसे - कार्यालय, गोदाम, लिलाव ओटे, लिलाव गृह, रस्ते, स्वच्छता गृहे, पाणी पुरवठा, जल नि:सारण व्यवस्था व्यवस्था, व्यापारी गाळे, शेतकरी निवास, गुरांचे शेड, सीमाभिंत, तारेचे कुंपण, हमाल भवन, शितगृहे तसेच केंद्र शासनाच्या बाजार आवार विकास बळकटीकरण योजनेअंतर्गत बाजार आवारातील विविध विकासकामे इत्यादींच्या उभारणीसाठी पणन मंडळाकडे येणा-या कर्ज मागणी प्रस्तावांची, त्या अनुषंगाने येणाऱ्या कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननीचे काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते. तसेच कृषि पणन मंडळामार्फत पणन मंडळाच्या स्वनिधी अथवा शासकीय अनुदानातुन उभारण्यात आलेली / येत असलेली शेतीमाल हाताळणी व प्रक्रिया प्रकल्पांची स्थापत्य विषयक व अनुषंगिक तांत्रिक कामकाज अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात येते.

अहवाल वर्षामध्ये (२०२०-२१) अभियांत्रिकी विभागामार्फत करण्यात आलेल्या विविध कामकाजाबाबतची माहिती पुढील प्रमाणे :-

**अभियांत्रिकी विभागामार्फत खालील १५ कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या कर्ज मागणी प्रस्ताव त्रुटी पुर्तता प्रस्ताव / कर्ज विनियोग दाखला प्रस्तावांची तांत्रिक छाननी करण्यात आलेली आहे;**

| अ.क्र | बाजार समिती नाव व जिल्हा | अ.क्र | बाजार समिती नाव व जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | इंदापुर, जि.पुणे, | ९ | नांदगांव, जि. नाशिक |
| २ | मानवत, जि. परभणी | १० | दुधनी, जि. सोलापुर |
| ३ | संगमनेर, जि. अहमदनगर | ११ | जवळाबाजार, जि. हिंगोली |
| ४ | महाड, जि. रायगड, | १२ | पाटण, जि. सातारा |
| ५ | लाखणी, जि. भंडारा | १३ | मंगळुरपिर, जि. वाशिम, |
| ६ | काटोल, जि. नागपुर | १४ | चांदवड, जि. नाशिक |
| ७ | गेवराई,जि.बीड | १५ | पारनेर, जि. अहमदनगर, |
| ८ | बाभुळगाव, जि. यवतमाळ | | |

**ब) निर्यात सुविधा केंद्राची उभारणी**

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प किंमत (रु. लाख) | प्रकल्पाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १ | आधुनिक फळे व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्र, जामगे, ता.खेड जि.रत्नागिरी | ८९२.२८ | काम पुर्ण |

क) महाराष्ट्र शासनामार्फत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित " महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाअंतर्गत कृषि पणन मंडळाच्या अस्तित्वातील १६ सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण व प्र ३ नविन सुविधा १) बारामती, २) पाचोड ता.पैठण ३) बीड) व NIPHT संस्थेचे बळकटीकरण करणे इ.कामांचा समावेश आहे.सदर कामांची निविदा प्रक्रिया कार्यवाही प्रगतीत आहे. सुविधा केंद्राची यादी खालील प्रमाणे;

| अ.क्र | सुविधा केंद्राच नाव | प्रस्तावित प्रकल्प किंमत (रु. कोटी) |
|---|---|---|
| **अ)** | **अस्तित्वातील १६ सुविधा केंद्रांचे विस्तारिकरण / आधुनिकीकरण** | |
| १ | निर्यात सुविधा केंद्र, मोहाडी, ता. दिंडोरी, जि. नाशिक | ४.९९ |
| २ | निर्यात सुविधा केंद्र, कळवण, ता. कळवण, जि. नाशिक | ४.९८ |
| ३ | निर्यात सुविधा केंद्र, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक | २.१४ |
| ४ | निर्यात सुविधा केंद्र, सावदा, ता. रावेर, जि. जळगांव | ७.०५ |
| ५ | निर्यात सुविधा केंद्र, जालना, जि. जालना | १.२८ |
| ६ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, करमाड, जि. औरंगाबाद | १.४२ |
| ७ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, अर्धापूर, जि. नांदेड | ०.६३ |
| ८ | सुविधा केंद्र, लातुर, जि. लातुर | ३.५७ |
| ९ | फळे व भाजीपाला आधुनिक सुविधा केंद्र, चांदुर रेल्वे, जि. अमरावती | २.९० |
| १० | निर्यात सुविधा केंद्र, रा. सु. प. तं. संस्था, तळेगांव दा. , जि. पुणे | ३.८४ |
| ११ | संत्रा निर्यात सुविधा केंद्र, कारंजा (घा.), जि.वर्धा | ६.३२ |
| १२ | व्हेपर हिट ट्रिटमेंट सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | १.४३ |
| १३ | भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | ०.९८ |
| १४ | विकिरण सुविधा केंद्र, वाशी, नवी मुंबई | ५.०८ |
| १५ | द्राक्ष व डाळींब निर्यात सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे | ४.५२ |
| १६ | डाळींब निर्यात सुविधा केंद्र, आटपाडी, जि. सांगली | २.७९ |
| | अपेडा ॲक्रिडिटेशन : सुविधा केंद्र, वरुड, जि. अमरावती | ०.६२ |
| | अपेडा ॲक्रिडिटेशन : सुविधा केंद्र, बीड, जि.बीड | ०.५० |
| **ब)** | **नियोजित प्रकल्प :** | |
| १ | फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, बारामती, जि. पुणे | ५२.५९ |
| २ | फळे व भाजीपाला हाताळणी सुविधा केंद्र, पाचोड, ता. पैठण, जि. औरंगाबाद | १८.२२ |
| ३ | सिताफळ हाताळणी सुविधा केंद्र, बीड, जि. बीड | ६.८५ |
| **क)** | रा.सु.प.तं.संस्था, तळेगांव दा, जि. पुणे संस्थेचे बळकटीकरणांतर्गत विविध विकास कामे करणे. | १५.५४ |
| | **एकुण** | **१४८.२४** |

## क ( राष्ट्रीय कृषि विकास योजने अंतर्गत व ई-नाम योजने अंतर्गत मंजुर प्रकल्पाच्या अंमलबजावणी बाबत कार्यवाही.)

### १) राज्यातील ८६ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करणे –

धान्य साफसफाईसाठी व प्रतवारीसाठी धान्य चाळणी प्रतवारी यंत्र (Grain Cleaning and Grading Machine) सुविधा बाजार समितीच्या आवारामध्ये उभारणी केल्यास शेतकऱ्यांच्या शेतीमालास चांगला दर मिळू शकेल. याबाबीचा विचार करुन राज्यातील प्रामुख्याने धान्याची आवक असणाऱ्या बाजार समित्यांमध्ये नवीन धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी कृषि पणन मंडळामार्फत राष्ट्रीय कृषी विकास योजनेकडे तसेच ई- नाम योजनेकडे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत राज्यातील ३१ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेच्या नवीन धान्य चाळणी यंत्राची सुविधा उभारणी करण्यासाठी दि. १५/१२/२०१७ रोजीच्या २४ व्या SLSC बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि.०४/०९/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणुन नियुक्त करण्यात आलेले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दि. २४/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये भारत सरकारच्या ई-नाम योजनेअंतर्गत राज्यातील ५५ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी २ मेट्रिक टन प्रती तास क्षमतेचे एक धान्य चाळणी प्रतवारी यंत्र उभारणी करण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे. या दोन्ही प्रकल्पांचा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे;

(रुपये कोटी)

| धान्य चाळणी प्रतवारी यंत्र प्रकल्प (क्षमता प्रत्येकी २ मे.टन प्रती तास) | एकुण अंदाजित खर्च | अनुदान | पणन मंडळ गुंतवणुक | बा.स.स्वनिधी गुंतवणुक/ पणन मंडळाचे कर्ज |
|---|---|---|---|---|
| **रा.कृ.वि.यो. : ३१ बा.स.** | २१.६९ | ५.०५ | ३.५० | १३.१४ |
| **ई नाम-: ५५ बा.स.** | ३८.४८ | १९.१६ | -- | १९.३२ |
| **एकुण** | **६०.१७** | **२४.२१** | **३.५०** | **३२.४६** |

या प्रकल्पासाठी एकूण खर्च रु. ६०.१७ कोटी येणार असून राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत व ई-नाम योजने अंतर्गत एकूण अनुदान रु. २४.२१ कोटी मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये पणन मंडळामार्फत रु. ३.५० कोटीची गुंतवणूक केली जाणार आहे व उर्वरीत रक्कम रु. ३२.४६ कोटी बाजार समित्यांनी त्यांचे स्वनिधीमधून गुंतवणुक करावयाची आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना पणन मंडळाच्या मा.संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार स्वनिधीची रक्कम गुंतवणूक करण्यासाठी आवश्यकतेनुसार पणन मंडळामार्फत ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पणन मंडळामार्फत सुरु असुन धान्य चाळणी यंत्र शेड बांधकामे व मशीनरी उभारणीची कामे प्रगतीपथावर आहेत. अहवाल वर्ष अखेरीस एकूण ३९ बाजार समित्यांमध्ये धान्य चाळणी शेड बांधकाम व मशीनरी उभारणीचे काम पुर्ण झाले असून उर्वरित ठिकाणी काम प्रगतीपथावर आहे. ज्या ठिकाणी धान्य चाळणी यंत्र प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे, अशा ठिकाणी सदर प्रकल्प वापरासाठी संबंधित बाजार

समितीकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत. या प्रकल्पामुळे शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत खरेदीसाठी तसेच खुल्या बाजारामध्ये शेतीमाल विक्रीसाठी शेतक-यांना फायदा होणार आहे.

**२) राज्यातील १०८ बाजार समित्यांमध्ये एकूण १०८ गोदामांची उभारणी करणे –**

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यासाठी ( Pledge Loan) व शासकीय हमीभाव खरेदी केंद्रा अंतर्गत शेतमाल साठवणुकीसाठी बाजार समित्यांचे आवारामध्ये गोदामांची उभारणी करण्यासाठी दि. २५/०७/२०१८ रोजीच्या रा कृ वि यो च्या २५ व्या SLSC बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत राज्यातील एकूण १०८ बाजार समित्यांमध्ये प्रत्येकी १००० मेट्रिक टनाचे एक या प्रमाणे नवीन १०८ गोदामांची उभारणी करण्यात येत आहे. त्यासाठी एकूण खर्च रु. ११६.४६ कोटी येणार असून त्यापैकी राष्ट्रीय कृषि विकास योजने कडून ३६ % अनुदान रु. ४१.८६ कोटी मंजूर करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पामध्ये पणन मंडळामार्फत रु. २३.१९ कोटीची गुंतवणूक केली जात आहे व उर्वरीत रक्कम रु. ५१.४१ कोटी बाजार समितीने स्वनिधीमधून गुंतवणुक करावयाची आहे. या योजनेमध्ये समाविष्ट बाजार समित्यांना पणन मंड़ळाच्या मा. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आवश्यकतेनुसार स्वनिधीची रक्कम रु.५१.४१ कोटी ३ % वार्षिक व्याज दराने कर्ज म्हणुन पणन मंडळामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर प्रकल्प अंमलबजावणी चा वित्तीय आराखडा खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| **गोदाम प्रकल्प** | **एकुण अंदाजीत खर्च** | **रा.कृ.वि.यो. अनुदान** | **एकुण अंदाजीत खर्च** | **रा.कृ.वि.यो. अनुदान** |
|---|---|---|---|---|
| | १००% | ३६% | २०% | ४४% |
| रा.कृ.वि.यो. अंतर्गत राज्यातील १०८ बा.स. मध्ये प्रत्येकी १००० मे. टन. क्षमतेची एकुण १०८ गोदामे उभारणी करणे. | ११६.४६ | ४१.८६ | २३.१९ | ५१.४१ |

सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाच्या दि. १२/१०/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृषि पणन मंडळास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी पणन मंडळामार्फत सुरु असुन गोदाम बांधकामे प्रगतीपथावर आहेत. अहवाल वर्ष अखेरीस एकूण ४१ गोदामांचे बांधकाम पुर्ण झालेले असून ५८ गोदामांची कामे पुर्णत्वाकडे आलेली आहेत. उर्वरित ९ गोदामांची कामे प्रगतीपथावर आहेत. ज्या ठिकाणी गोदाम बांधकामे पूर्ण झाली आहेत, अशा ठिकाणी सदर गोदामे वापरासाठी संबंधित बाजार समितीकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत. या योजनेमुळे राज्यामध्ये शेती मालासाठी १,०८,००० मेट्रिक टन अतिरिक्त साठवणूक क्षमता निर्माण होत आहे.

# इ) संगणक विभाग

## १) मार्कनेट प्रकल्प:

मार्कनेट म्हणजे मार्केट नेटवर्क. या अंतर्गत कृषि पणन मंडळाने राज्यातील सर्व बाजार समित्या संगणकीकृत करुन इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या आहेत. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश बाजार समित्यांच्या आवारात येणाऱ्या शेतमालाच्या माहितीची (आवक व दर) देवाण-घेवाण करुन, शेतकऱ्याच्या शेतमालास रास्त भाव मिळवून देणे, तसेच बाजार समितीच्या कामकाजामध्ये सुसुत्रता आणणे हा आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील २९४ मुख्य बाजार व ६६ उपबाजार यांना संगणक संच व तत्सम सामुग्री इंटरनेटसह विनामूल्य पुरविण्यात आली आहे. बाजार समितीमार्फत दैनिक शेतमालाची आवक व बाजारभाव संगणकामध्ये भरुन पणन मंडळाच्या वेबसाईटवर (www.msamb.com) अपलोड करण्यात येतात. याप्रमाणे सर्व संगणकीकृत बाजार समित्यांची माहिती वेबसाईटद्वारे एकत्रित करुन सर्वांना उपलब्ध करण्यात येते.

राज्यातील सर्व बाजार समित्यांना कृषि पणन मंडळाची ई-मेल सुविधा पणन मंडळामार्फत विनामुल्य पुरविण्यात आली आहे. कृषि पणन मंडळ व बाजार समित्या यामधील पत्र व्यवहार व माहीती देवाण घेवाण या ई-मेल सुविधेद्वारे सुरू आहे. यामुळे माहीती देवाण घेवाणसाठी लागणा-या वेळेत व खर्चात बचत झाली आहे.

## २) राष्ट्रीय कृषि बाजार (eNAM) योजना:

शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागा मार्फत राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम) कार्यान्वित केले आहे. ई-नामचे कामकाज ई-ट्रेडींग प्लॅटफॉर्म द्वारे सुरु आहे. केंद्र शासनाकडून बाजार समित्यांना सॉफ्टवेअर, प्रशिक्षण व सेवा विनामूल्य देण्यात येत असून संगणक व ग्रेडींग सामुग्री खरेदीसाठी प्रति बाजार समिती रु.३०/- लाख अनुदान देण्यात येते. ई-नाम अंतर्गत महाराष्ट्रात पहिल्या टप्यात ३०, दुस-या टप्यात ३० अश्या एकूण ६० बाजार समित्यांचा समावेश करण्यात आला आहे.

नव्याने ५८ बाजार समित्या ई-नामला जोडण्यात आल्या असुन या ५८ बाजार समित्यांमध्ये ई-नाम अंमलबजावणी बाबतचे काम पुर्ण झाले आहे. याप्रमाणे राज्यात एकूण ११८ बाजार समित्यांमध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री, ई-ऑक्शन व ई-पेमेंट बाबतचे काम सुरु झाले आहे.

**ई-नाम योजनेतील ११८ बाजार समित्यांची राज्यातील सद्यस्थीती -**
**सप्टेंबर २०१७ ते ३१ मार्च २०२१ पर्यंत**

- ११८ बाजार समित्यांमध्ये ई-ऑक्शन सुरु. एकूण १६९ लाख क्विं., किंमत - रु. ४९४०/- कोटी.
- शेतमालाची गुणवत्ता तपासणीसाठी १०४ बाजार समित्यांमध्ये असेईंग लॅब कार्यान्वित. १४ बाजार समित्यांमध्ये मॉईश्चर मिटरचा पुरवठा व लॅब उभारणी बाबत कार्यवाही सुरु.
- ८८ बाजार समित्यांमध्ये असेईंग सुरु, एकूण ६.७० लाख लॉटस् चे असेईंग.
- ७५ बाजार समित्यांमध्ये ई-पेमेंट सुरु एकूण रक्कम रु. १२५.८३/- कोटी.

- शेतकरी नोंदणी – ११.९४ लाख
- खरेदीदार (व्यापारी) नोंदणी - १९,७६५
- आडते नोंदणी – १६,१०४
- एफ.पी.ओ नोंदणी - २५७
- एफ.पी.ओ. ट्रेड - १० एफ.पी.ओ., ६५०१ क्विं., किंमत - रु. २.८३/- कोटी
- प्रती लॉट बोली लावण्याचे सरासरी प्रमाण - ६.१७

**६० बाजार समित्यांनी आयोजित केलेल्या ग्राम सभा (देशामध्ये राज्याचा प्रथम क्रमांक)**

- एकूण ग्राम सभा - १८२८
- सहभागी शेतकरी - ९६६०९

## ३) डी.एम.आय. भारत सरकार यांचे कडून संगणक चालकास प्रोत्साहन भत्ता :

डी.एम.आय. भारत सरकार यांचे द्वारे Marketing Research & Information Network Scheme अंतर्गत अँगमार्कनेट वेबसाईटवर प्रत्येक महिन्याला २० दिवसांपेक्षा जास्त दिवस बाजारभाव माहिती भरणा-या बाजार समितीच्या कर्मचाऱ्यास रु.१०००/- प्रती माह प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. डि.एम.आय., भारत सरकार यांचे कडे प्रोत्साहन भत्ता मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. आत्तापर्यंत रु.८६.२६/- लाख प्रोत्साहन भत्ता वाटप केला आहे.

## ४) सांख्यिकीय माहिती:

राज्यातील सर्व बाजार समित्यांची प्रशासकीय व सांख्यिकीय माहिती संगणकामध्ये साठविणेसाठी व विविध अहवाल तयार करण्यासाठी डेटाबेस तयार करण्यात आला आहे. या डेटाबेस चा उपयोग करुन बाजार समित्यांचे उत्पन्न, खर्च, मार्केट फी तसेच बाजार समित्यांमधील शेतमालाची आवक व किंमत याबाबत माहिती आवश्यकते प्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन व इतर संबंधितांना वेळोवेळी पुरविण्यात येत आहे.

# ई) जनसंपर्क व प्रसिध्दी विभाग

**बाजार समिती पदाधिकारी / अधिकारी / शेतकरी प्रशिक्षण :**

कृषि पणन मंडळामार्फत राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे पदाधिकारी आणि अधिकारी यांना तसेच बाजार समित्यांचे कार्यक्षेत्रातील शेतक-यांना कृषि पणन मंडळामार्फत, तळेगांव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्याचे काम करण्यात येते. दिनांक ०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ अखेर राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव मार्फत बाजार समिती अधिकारी / कर्मचारी यांना बाजार समित्यांचे कामकाज व नविन कायदे, संगणक विषयक प्रशिक्षण, बाजार समित्यांचा अर्थसंकल्प व लेखे विषयक टॅली संगणक प्रणाली इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते तर शेतक-यांसाठी हरितगृह व्यवस्थापन, नर्सरी व्यवस्थापन, शेड नेट, टिश्यू कल्चर, लॅन्ड स्केप, मार्केटिंग इ. विषयाअंतर्गत अहवाल काळात कोरोनाजन्य परिस्थिती असल्याने ऑनलाईन १६ व ऑफलाईन ०३ असे एकूण १९ प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले आणि या प्रशिक्षणाअंतर्गत ऑनलाईनद्वारे ४८१ व ऑफलाईनद्वारे १९९ असे एकूण ६८० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यात आले.

**'कृषि पणन मित्र ' मासिक :**

कृषि पणन मंडळामार्फत दर महिन्याला ‘ कृषि पणन मित्र’ मासिक प्रसिध्द करण्यात येते. सदरचे मासिक प्रत्येक महिन्याला मासिकाचे वर्गणीदार, राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, जिल्हा परिषदा, पणन मंडळाचे संचालक मंडळ, मंत्रीमंडळ, मंत्रालयीन सचिव, वृत्तपत्रे, कृषि मासिके, इत्यादींना पाठविण्यात येते. अंकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करणेसाठी बाजार समिती, कृषि विभाग व सहकार विभागामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्यातील सर्व ग्रामपंचायती आणि विविध कार्यकारी सहकारी संस्था यांना वर्गणीदार करणेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदर मासिकामध्ये कृषि उत्पादन, पिक संरक्षण, कृषी क्षेत्रातील उच्च तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, बी-बियाणे, प्रक्रिया उद्योग, पणन व निर्यात केंद्रे, राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजना, सुगी पूर्व व सुगी पश्चात तंत्रज्ञान, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, इ. विषयांवर विविध तज्ञांचे लेख प्रसिध्द करण्यात येत असतात.

अहवाल वर्षात महिनानिहाय वितरीत अंकांची संख्या :

| अ.क्र. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| १. | एप्रिल २०२० | कोरोना लॉकडाऊन |
| २. | मे २०२० | कोरोना लॉकडाऊन |
| ३. | जून २०२० | १६२५३ |
| ४. | जुलै २०२० | १६८९९ |
| ५. | ऑगस्ट २०२० | १६९३९ |
| ६. | सप्टेंबर २०२० | १६६१५ |
| ७. | ऑक्टोबर २०२० | १५२६० |
| ८. | नोव्हेंबर २०२० | १५६०३ |

| अ.क्र. | महिना | वितरीत अंक |
|---|---|---|
| ९. | डिसेंबर २०२० | १५३९५ |
| १०. | जानेवारी २०२१ | १५६८९ |
| ११. | फेब्रुवारी २०२१ | १५९५२ |
| १२. | मार्च २०२१ | १५९९४ |

अहवाल वर्षात कृषि पणन मित्र मासिकाचे सुमारे ३ लाख वाचक आहेत.

**कृषि पणन मंडळाची दिनदर्शिका २०२० व दैनंदिनी २०२० :-**

सन २०२१ मध्ये पणन मंडळाची दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई करुन, मंडळाचे दिनदर्शिकेवर कृषि पणन मंडळाच्या विविध योजनांची माहिती व दैनंदिनीमध्ये राज्यातील बाजार समित्या, कृषि विभाग, सहकार विभाग, मंत्रालयातील अधिकारी वर्ग इत्यादी बाबत माहिती छापण्यात येते. सदर दिनदर्शिका व दैनंदिनी यांच्या प्रती राज्यातील बाजार समित्या, सर्व सहकारी संस्था, मंत्रालयातील पदाधिकारी व अधिकारी, पणन मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना वितरीत करण्यात आल्या. सदर दिनदर्शिका व दैनंदिनी मार्फत कृषि पणन मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी चांगला उपयोग होत आहे.

**प्रदर्शन / कार्यशाळा / चर्चासत्र / परीषद सहभाग व आर्थिक मदत :-**

कृषी पणन मंडळाच्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम आणि कार्यक्रम यांची माहिती राज्यातील शेतक-यांना व्हावी व याचा फायदा जास्तीत जास्त शेतक-यांना करुन देण्याच्या दृष्टिकोनातून, राज्यातील विविध भागातील प्रदर्शनामध्ये सहभाग घेण्यात येतो. तसेच सदर प्रदर्शनामध्ये सक्षम अधिका-यांचे मंजुरीने सहभाग घेवून, मंडळाचे विविध योजना / उपक्रम याचा प्रचार व प्रसिध्दी करून, त्यामध्ये कृषी पणन मित्र मासिकाचे जास्तीत जास्त वर्गणीदार करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात येतात. चालू आर्थिक वर्षामध्ये कोरोना लॉकडाऊनमुळे राज्यातील विविध प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतलेला नाही.

तसेच आर्थिक वर्षामध्ये कृषि विषयक चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन आयोजित करण्यासाठी वेळोवेळी कृषि विद्यापिठे, कृषि विभाग, शास्त्रज्ञांच्या संस्था, कृषि उत्पन्न बाजार समित्या , कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्था यांच्याकडून पणन मंडळाकडे अर्थसहाय्य मिळणेबाबत विनंती केली जाते. पणन व्यवस्थेसंदर्भात प्रशिक्षण, प्रदर्शन, चर्चासत्र इत्यादींचे आयोजन करणे हे पणन मंडळाचे कार्य आहे. अशा प्रकारचे कामकाज इतर संस्था करीत असल्यास त्यांच्या चर्चासत्र, प्रशिक्षण, प्रदर्शन इत्यादींच्या आयोजनाकरीता कृषि पणन मंडळाकडून आर्थिक सहाय्य व कृषि पणन विषयक कामकाजांना गती देण्यासाठी आवश्यक आहे. कोरोना लॉकडाऊनमुळे सन २०२०-२०२१ मध्ये विविध कृषि पणनाशी संबंधित सहकारी संस्थांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

**कृषि पणन मंडळ जाहिरात :-**

कृषि पणन मंडळाची खालील मासिके व विशेषांकामध्ये जाहिरात देण्यात आली. मासिकांतील व विशेषांकांतील जाहिरातीमुळे पणन मंडळास विविध भागातून उदा. ग्राम पातळीवर, शहर पातळीवर प्रसिध्दी मिळते तसेच पणन मंडळाच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचते.

| अ.क्र. | संस्थेचे / मासिकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| १. | दै. सामना | दि.२९ जुलै २०२० |
| २. | शरद जोशी विचारमंच शेतकरी संघटना | किसान डायरी २०२१ |
| ३. | दै. पुढारी | ८२ वा वर्धापन दिन - झेप नव्या दशकाची विशेषांक |
| ४. | दै. ॲग्रोवन | बाजार समिती विशेषांक |
| ५. | दै. लोकमान्य सांजवार्ता | वर्धापन दिन विशेषांक |
| ६. | दै. पुण्यनगरी | वर्धापन दिन विशेष पुरवणी |

**प्रसिद्धी :**

कृषि पणन मंडळातर्फे विविध प्रकारच्या कार्यशाळा, प्रदर्शन, चर्चासत्र, इतर अनुषंगिक कार्यक्रम व पत्रकार परिषद आयोजित केल्या जातात. मा. अध्यक्ष कृषि पणन मंडळ यांच्या पत्रकार परिषद, प्रेसनोट तसेच इतर प्रसिध्दीचे कामकाज करण्यात येते.

**लेख प्रसिध्दी :**

लेख प्रसिध्दी – कृषि पणनाशी संबंधित माहिती शेतकरी, सह. संस्था, शास्त्रज्ञ, अधिकारी, पदाधिकारी, विस्तार कार्यकर्ते यांचेमार्फत पोहोचविण्यासाठी कृषि पणन मंडळ सतत प्रयत्नशिल आहे. कृषी पणनाशी संबंधित माहितीवर आधारित विविध लेख अहवाल वर्षात प्रसिध्द करण्यात आले आहेत.

**दूरदर्शन आणि आकाशवाणी कार्यक्रमात सहभाग :**

कृषि पणन मंडळ, दूरदर्शन, मुंबई व पुणे, आकाशवाणी पुणे केंद्राच्या ग्रामीण कार्यक्रम सल्लागार समितीचे सदस्य आहे. दूरदर्शन केंद्र, पुणे व मुंबई, आकाशवाणी पुणे केंद्रावरुन तसेच इतर आकाशवाणी केंद्रावरुन कृषि पणन मंडळाचे विविध कार्यक्रम, योजना, उपक्रम यांची माहिती तसेच शेतक-यांना कृषि तंत्रज्ञानाची माहिती होण्याच्या दृष्टिकोनातून पणन मंडळाच्या तज्ञांचे कार्यक्रम प्रसारीत करण्यात येतात. तसेच प्रत्येक तिमाहीसाठी विषय आणि तज्ञांची नावे कळविण्यात येतात. या कार्यक्रमांमुळे शेतक-यांना कृषि पणन मंडळाच्या योजना व कृषि विषयक मार्गदर्शन मिळण्यास मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे.

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षामध्ये दूरदर्शन, मुंबई व दूरदर्शन केंद्र, पुणे वरुन "कृषि दर्शन" या कार्यक्रमाअंतर्गत पणन मंडळाच्या अधिका-यांचे ३ कार्यक्रम प्रसारित करण्यात आले.

# प) देशांतर्गत व्यापार विकास विभाग

**उदिष्टे:**

कृषी विपणन ही अतिशय महत्वाची क्रिया आहे. देशांतर्गत व्यापार विकास विभागाचा मुख्य उद्देश शासकीय योजना आणि कृषि पणन मंडळाने विकसित केलेल्या विविध उपक्रमांच्या मदतीने शेती व्यापार विकसित करणे हा आहे. शेतकरी आणि ग्राहकांसाठी थेट विक्री व्यवस्था तयार करणे, खरेदीदार-विक्रेता संमेलनाचे आयोजन करणे, शेतकऱ्यांसाठी शेतमाल विक्रीकरीता नवनवीन योजना तयार करणे, नवीन आणि संभाव्य बाजारपेठांची माहिती घेणे व शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देणे ही देशांतर्गत व्यापार विकास विभागाची प्रमुख कार्ये आहेत.

**उत्पादक ते ग्राहक थेट विक्री उपक्रम :**

कृषि मालाच्या विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची साखळी वगळून उत्पादकांना थेट ग्राहकाला दर्जेदार मालाची किफायतशीर दरांमध्ये विक्री करता यावी यासाठी कृषि पणन मंडळामार्फत उत्पादक ते ग्राहक थेट विक्रीचा अभिनव उपक्रम आंबा महोत्सवाद्वारे सन २००३ पासून राबविण्यात येत आहे. हा उपक्रम पुढे सुरु रहावा या उद्देशाने कृषि पणन मंडळाने फळ व धान्य महोत्सव या योजनेची सुरुवात केली.

**१) फळ व धान्य महोत्सव अनुदान योजना:-**

आंबा, संत्रा, मोसंबी, द्राक्ष या सारखी हंगामी फळे तसेच धान्य यांचे थेट उत्पादक ते थेट ग्राहक विक्रीसाठी महोत्सवांचे आयोजन करण्याकरिता ही योजना राबविण्यात येते.

**लाभार्थी:-**

राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्या, कृषि मालाच्या विपणनासंबधित स्थापित असलेल्या सहकारी संस्था, शासनाचे विभाग, उत्पादकांच्या सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणीकृत संस्था

**नियम व अटी:-**

१) महोत्सवाचा कालावधी हा किमान ५ (पाच) दिवसांचा असावा.

२) महोत्सवास प्रति स्टॉल रू.२००० /- प्रमाणे अर्थसहाय्य देय राहील.

३) महोत्सवामध्ये किमान १० व कमाल ५० स्टॉलसाठी अर्थसहाय्य देय राहील.

४) महोत्सवासाठी जास्तीत जास्त रू १.०० लाख अनुदान देय राहील.

५) फळ व धान्य महोत्सव आयोजनासाठी लाभार्थीस एका आर्थिक वर्षात एकदाच अनुदान देय राहील.

६) महोत्सवाच्या प्रचार व प्रसिध्दीमध्ये उदा.बॅनर्स ,जाहीरात,बातम्या,बॅकड्रॉप,हॅन्ड बील,इ.मध्ये कृषि पणन मंडळाचा सहप्रायोजक म्हणून नामोल्लेख करणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

७) कृषि पणन मंडळास महोत्सवामध्ये स्टॉल घ्यावयाचा झाल्यास त्यासाठी आवश्यक स्टॉलची मोफत उपलब्धता करून देणे आयोजकांवर बंधनकारक राहील.

८) महोत्सवाचा अहवाल व काही निवडक फोटो कृषि पणन मंडळाच्या 'कृषि पणन मित्र' मासिकामध्ये प्रकाशित करण्यासाठी पणन मंडळाकडे सादर करावेत.

९) महोत्सवातील प्रत,दर व इतर अनुषंगिक व कायदेशिर बाबींसाठी कृषि पणन मंडळ जबाबदार राहणार नाही.तथापी चांगल्या गुणवत्तेचाच माल विकणे स्टॉलधारकांवर बंधनकारक राहील.याची खातरजमा करणे आयोजकांवर राहील.

१०) महोत्सव आयोजनासाठीचा परिपुर्ण प्रस्ताव कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या शिफारशीसह सादर करणे आवश्यक आहे.

११) महोत्सव हा फक्त उत्पादकांकरिता असल्याने त्यामध्ये व्यापा-यांना सहभागी होता येणार नाही किंवा मार्केटमधून आणुन मालाची विक्री करता येणार नाही.असे आढळून आल्यास अनुदानासाठी अपात्र ठरविले जाईल.

१२) महोत्सवाकरिता इतर कोणत्याही शासकिया योजनेअंतर्गत अनुदान घेतल्यास या योजनेअंतर्गत अनुदान देय होणार नाही.

१३) उपरोक्त नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रू १०० /- च्या स्टँपपेपरवर लिहून देणे बंधनकारक आहे.

१४) राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांना एका आर्थिक वर्षात जास्तीत जास्त पाच वेळा महोत्सावाचे आयोजन करण्यास तसेच सर्व महोत्सवांचे मिळुन ५० स्टॉलसाठी (प्रति महोत्सव कमीत कमी १० स्टॉल) प्रति स्टॉल रू. २००० प्रमाणे कमाल अनुदान रू १.०० लाख असेल.

१५) महोत्सव आयोजन करणेसाठी अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र (Fire NOC) घेणे बंधनकारक राहील.

१६) **कोरोना विषाणु प्रादुर्भावाचे पार्श्वभूमीवर देशांतर्गत व्यापार विकास विभागामार्फत शेतमाल विक्रीबाबत करण्यात आलेल्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती खालीलप्रमाणे-**

**अ. शेतकरी ते ग्राहक भाजीपाला व फळे विक्रीबाबत करण्यात आलेल्या कामकाजाचा तपशील**

- कोरोना संकटाचे संधीमध्ये रूपांतर करत शेतक-यांना शेतमाल विक्रिसाठी चे विविध पर्याय पणन मंडळाने उपलब्ध करून दिले. त्याद्वारे शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या यांनी आपला शेतमाल थेट ग्राहकांना विक्री केलेला आहे.
- विविध शेतकरी,शेतकरी गट,शेतकरी उत्पादक कंपनी यांचेकडुन त्यांचेकडे विक्रीसाठी उपलब्ध असणा-या शेतमालाच्या विक्रीबाबत विचारणा करण्यात येत होती.याबाबत सदरील शेतकरी,गट यांची गृह सोसायटी, वैयक्तिक खरेदीदार,शेतकरी उत्पादक कंपनी, एन.जी.ओ. यांचेशी सांगड घालण्यात येऊन समन्वय साधण्यात आला.
- पणन मंडळाकडे नोंद असलेल्या १३ शेतकरी उत्पादक कंपन्यांची माहिती मनपा पुणे यांना तात्काळ उपलब्ध करून देण्यात आली. यामुळे पुणे मनपांस त्यांच्या ४१ प्रभागअंतर्गत असणा-या सोसायटी मध्ये भाजीपाला उपलब्ध करण्यास तात्काळ सुरूवात करणे शक्य झाले. याव्यतीरीक्त इतरही शेतकरी उत्पादक कंपन्यांना थेट सोसायट्यांना जोडून देण्यात आले.
- या माध्यमातून दि.२७ मार्च ते ३१ मे, २०२० या लॉकडाऊन कालावधीत थेट शेतकरी ते थेट ग्राहक या उपक्रमाअंतर्गत फळे व भाजीपाल्याची एकुण २४९९ मे.टन. एवढी विक्री झालेली आहे.

**ब) आंबा हंगाम २०२०-**

कृषि पणन मंडळाकडुन दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. तथापि, कोरोना प्रादुर्भावामुळे महोत्सवाचे आयोजन करणे शक्य न झाल्याने खालीलप्रमाणे पर्यायी व्यवस्था करण्यात आल्या होत्या;

१. **पुणे येथे वखार महामंडळाचे गोडाऊन तात्पुरत्या तत्वावर भाड्याने घेण्यात आले.**

या ठिकाणी आंबा उत्पादकांना आंबा साठवणूकीसाठी तसेच किरकोळ विक्रीसाठी वाहन उपलब्धतेची सुविधा करण्यात आली. या ठिकाणाहून सुमारे ७००० डझन आंबा वितरण करण्यात आला.

२. ग्राहकांकडुन आंबा उपलब्धतेबाबत सातत्याने विचारणा करण्यात येत होती.आंब्याच्या थेट खरेदी-विक्रीसाठी पणन मंडळाच्या संकेस्थळावरील **bs.msamb.com** हे खरेदी-विक्रीकरीताचे ऑनलाईन पोर्टल कार्यरत करण्यात आले. याद्वारे सुमारे ३२५ आंबा उत्पादकांकडुन नोंदणी करण्यात आली तसेच आंबा उत्पादकांची यादी मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण संस्था, विविध कार्यालये, एन.जी.ओ., वैयक्तिक खरेदीदार यांना उपलब्ध करून देण्यात आली. या उपक्रमाद्वारे पुणे, मुंबई, ठाणे, अकोला, अमरावती, कोल्हापूर, नाशिक, सोलापुर, बारामती येथील वैयक्तिक खरेदीदार, रिटेलर्स, शेतकरी उत्पादक कंपनी, निर्यातदार, गृहनिर्माण संस्था यांचेकडुन सुमारे **६५,००० डझन आंबा थेट खरेदी करण्यात आला.**

३. हंगामाच्या सुरूवातीस शाशंक असलेला आंबा उत्पादक या थेट विक्रिच्या माध्यमातून सुमारे ६५००० डझन आंबा विक्री करत ग्राहकांना चांगल्या प्रतिचा आंबा रास्त दरात मिळाला तर आंबा उत्पादकांनी मध्यस्थ टाळत थेट ग्राहकांना विक्री केल्याने त्यांनाही चांगला दर मिळाल्याने उत्पादक व ग्राहक दोघेही समाधानी असल्याचे चित्र आहे.

**क) उत्पादक ते ग्राहक दुवा विकास (Linkage development)** -

देशांतर्गत व्यापार विकास विभागामार्फत राज्यातील विविध भाजीपाला, फळे, धान्य व प्रक्रियायुक्त पदार्थ यांच्या उत्पादकांना थेट ग्राहकांशी जोडून देण्याबाबत कामकाज करण्यात येते. यास अनुसरुन सन २०२०-२१ मध्ये काजू, गुळ, बेदाणा, संत्रा, मध, द्राक्ष व इतर प्रक्रिया युक्त पदार्थ यांच्या उत्पादकांना थेट ग्राहकांना जोडण्यात आले पैकी काही उत्पादकांची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | विक्रेता शेतकऱ्यांचे नांव | पत्ता | मोबाईल नंबर | विक्री केलेला माल |
|---|---|---|---|---|
| १. | श्री रोहीत गावडे | येळावी, ता. तासगाव, जि.सांगली | ९५७९१६५८१८ | बेदाणा |
| २. | समर्थ काजू रत्नागिरी, प्रो. चंद्रकांत मांडवकर | जि.रत्नागिरी | ८००७२९२३६२ | काजू |
| ३. | श्री सागर फराटे, | मु.पो.मांडवगण, ता.शिरुर जि. पुणे | ९८५०२७३३४४ | सेंद्रीय गुळ |
| ४. | श्री तेजस बायसेन ॲग्री कोर FPC, | ता.मोर्शी, जि.अमरावती | ७३८५४२२४१५ | संत्रा |
| ५. | श्री प्रितम सपकाळ, | मु.पो.सणसर, ता.इंदापूर, जि.पुणे | ९७६७७७७७४४ | द्राक्ष |
| ६. | श्री मेहबुब हासम मुकादम | मु.पो.मांदिवली, ता.दापोली, जि. | ९४०४४१४८२५ | काजू |

| अ.क्र. | विक्रेता शेतकऱ्यांचे नांव | पत्ता | मोबाईल नंबर | विक्री केलेला माल |
|---|---|---|---|---|
| | | रत्नागिरी | | |
| ७. | श्री संतोष नकाते | मु.पो.निमसोड, ता.खटाव, जि.सातारा | ९८६०४८३७५७ | द्राक्ष<br>बेदाणा |
| ८. | डॉ. फोंडे, पश्चिमघाट ॲग्रो फॉरेस्ट प्रो.कं., (वनामृत) | मलईवाडा, शाहूवाडी, कोल्हापूर | ९४०५२६०९८९ | नाचणी, तमालपत्र, शिकेकाई, करवंद पल्प, तांदुळ, फणस जॅम, जंगल मध, आंबा लोणचे, करवंद लोणचे |
| ९. | सौ. कमलताई परदेशी | अंबिका मसाले | ९७६४५५८८७४ | विविध प्रकारचे मसाले |
| १०. | ग्लोबल हायड्रोफोनिक्स, प्रो.संजय खुटवड | भारती विद्यापीठाच्या मागे, आंबेगांव (बु.), ता.हवेली, जि.पुणे | ७०५७६३९४५३/ ७७७४९६५२५८ | विविध प्रकारचा हायड्रोनाईज्ड भाजीपाला |
| ११. | श्री. मदन कुलकर्णी | जि.सोलापूर | ९८५००४९६९२ | ड्राय अनारदाना, फ्रेश अनारदाना, अनार ज्युस, कडीपत्ता पावडर |
| १२. | श्री प्रशांत सावंत, सहयोग परिवारचे संस्थापक अध्यक्ष व प्रसारी हनीबीज प्रा.ली., चे संचालक | ता.हवेली, जि.पुणे | ९४२३८५१०१६ | मध |
| १३. | सौ.सारिका सासवडे | | ७३०४६१३३०२ | |

## आंतरराज्य शेतमाल व्यापार: रस्ते वाहतूक अनुदान योजना

महाराष्ट्र राज्य फळे व भाजीपाला उत्पादनात देशात आघाडीवर आहे. कांदे, टोमॅटो, डाळींब, द्राक्षे, केळी व आंबा हे प्रमुख फळे आणि भाज्या आहेत. फळे आणि भाजीपाला नाशवंत आहे आणि अयोग्य हाताळणी आणि साठवण पद्धतीमुळे तसेच वाहतूक विलंबामुळे फळे व भाजीपाल्यांचे काढणीपश्चात सुमारे २० ते ३० टक्के नुकसान होते. मागणी आणी चांगला दर यामुळे निर्यातीप्रमाणे देशांतर्गत व्यापार सुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. मूलतः शेतकरी त्यांच्या दैंनंदिन नित्यक्रमांमध्ये बदल करण्याच्या मानसिकतेत नसतो यामुळे वाहतूक भाडे भरुन शेतमाल परराज्यात पाठविण्यासाठी तयार होत नाही. शेवटी ते त्यांचे उत्पादन जवळच उपलब्ध असलेल्या बाजारपेठेत विकतात.

तथापि, अनेक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना इतर राज्यात पाठविण्याचे महत्त्व लक्षात आलेले आहे. म्हणून या परिस्थितीचा आणि व्यावहारिक बाबींचा अभ्यास करून आंतरराज्य व्यापारास प्रोत्साहन देण्यासाठी कृषि पणन मंडळाने रस्ते वाहतूक अनुदान योजना राबविण्याचा निर्णय घेतला.

या योजनेअंतर्गत दि.३१ मार्च २०२३ पर्यंत देशांतर्गत रस्ते वाहतूक भाड्यामध्ये अनुदान (Transport Subsidy) देण्यात येणार आहे.

**सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे;**

१. सदर योजना केवळ महाराष्ट्रातून रस्ते वाहतूकीद्वारे परराज्यात शेतमाल वाहतूक करून प्रत्यक्ष विक्री करण्यात येणा-या व्यवहारासाठी लागू राहील.

२. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्था योजनेअंतर्गत अनुदान मिळणेस्तव पात्र असतील.

३. राज्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपन्या,शेतमाल उत्पादकांच्या सहकारी संस्थांच्या सभासदांनी स्वत: उत्पादित केलेला शेतमालच संबधीत राज्यामध्ये पाठविणे आवश्यक असेल.

४. योजनेंतर्गत कामकाज सुरू करणेपुर्वी अर्जदार संस्थेने पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक राहील.

५. सदर योजना आंबा, केळी, डाळींब, द्राक्षे, संत्रा, मोसंबी, कांदा, टोमॅटो, आले व भाजीपाला या नाशवंत पिकांसाठीच लागू राहील.तसेच यामध्ये नमूद नसलेला नाशवंत शेतमाल परराज्यात विक्री करावयाचा झाल्यास लाभार्थी संस्था/ कंपनीने तसा स्पष्ट उल्लेख करून पणन मंडळाची पुर्वमान्यता घेणेआवश्यक राहील.

६. सदर योजनेमध्ये रस्तेमार्गे प्रत्यक्ष वाहतूक होणा-या शेतमालावर अनुदान देय राहील.यामध्ये इतर कोणत्याही अनुषंगिक खर्चाचा अंतर्भाव असणार नाही तसेच शेतमाल प्रत्यक्ष विक्री झालेनंतरच अनुदान देय राहील.

७. या योजनेअंतर्गत प्रत्यक्ष वाहतूक केलेल्या अंतरानुसार खालीलप्रमाणे अनुदान देय असेल;

| अ.क्र. | अंतर | देयअनुदान |
|---|---|---|
| १ | किमान ३५० ते ७५० कि. मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.२०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| २ | ७५१ ते १००० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.३०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ३ | १००१ ते १५०० कि.मी. पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.४०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ४ | १५०१ ते २००० कि.मी.पर्यंत | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.५०,०००/-यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ५ | २००१ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त अंतरासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.६०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |
| ६ | सिक्कीम, आसाम, अरूणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम,मेघालय व त्रिपुरा या राज्यासाठी | वाहतूक खर्चाच्या ५० टक्के अथवा कमाल मर्यादा रु.७५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम. |

८. महाराष्ट्रातील सीमेलगतच्या जिल्ह्यातील शेतमाल नियमीतपणे लगतच्या परराज्यात जात असल्याने अपरंपरागत व दूरवरील बाजारपेठांमध्ये शेतमाल पाठविणे अर्थक्षम होण्याच्या दृष्टीने ३५० कि.मी.पेक्षा कमी अंतरावरील वाहतूकीस कोणतेही अनुदान देय असणार नाही.

९. या योजनेअंतर्गत एका लाभार्थी शेतमाल उत्पादक सहकारी संस्था/उत्पादक कंपनीस एका आर्थिक वर्षात कमाल रू.३.०० लाख एवढे वाहतूक अनुदान देय असेल. सदर अनुदान केवळ महाराष्ट्रातून इतर राज्यात केलेल्या एकेरी वाहतूकीस लागू असेल.

१०. या योजनेअंतर्गत बिगर कृषिमालाची वाहतूक केल्याचे आढळल्यास त्यासाठी अनुदान देय असणार नाही.

११. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेने वाहतूकदारास देय असलेली वाहतूक भाड्याची रक्कम धनादेश/आरटीजीएस/ऑनलाईन बँकींगद्वारे अदा करणे बंधनकारक राहील.

१२. शेतकरी उत्पादक कंपनी/ सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाच्या प्राप्त विक्री रक्कमेतून अनुषंगीक खर्च जसे, शेतमालाची हाताळणी, विरळणी, वर्गीकरण, पॅकींग, हमाली, वाहतुक, व कंपनी/संस्थाचे सर्व्हिस चार्जेस इत्यादी खर्च,कपात करुन उर्वरीत रक्कम संबंधित उत्पादक सभासदांच्या खात्यावर वर्ग केल्यानंतर वाहतूक अनुदानासाठी अर्ज करू शकतील. कपात रक्कम व अनुषंगिक आर्थिक व्यवहार ही संबधित कंपनी/संस्था व उत्पादक सभासद शेतकरी यांची अंतर्गत बाब राहील. याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचा कोणताही संबध असणार नाही.

१३. शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्थेकडून पाठविण्यात आलेल्या कृषिमालाला गुणवत्ते अभावी अथवा अन्य कारणामुळे विक्री रक्कम प्राप्त न झाल्यास त्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ जबाबदार असणार नाही तसेच सदर प्रकरणी वाहतूक अनुदान देय असणार नाही.

१४. अनुदान संपुर्णपणे नामंजूर,अंशत:मंजूर अथवा पुर्णपणे मंजूर करण्याचे सर्वाधिकार महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळास राहतील व तो निर्णय संबंधित अर्जदारावर बंधनकारक असेल.तसेच,योजनेच्या अटी/ शर्तीमध्ये उचित बदल करण्याचे अधिकार पणन मंडळास राहतील.

१५. संबंधीत शेतकरी उत्पादक कंपनी/सहकारी संस्था यांनी या योजनेअंतर्गत परराज्यात पाठविण्यात आलेल्या वाहतूक खर्चाचे अनुदान मागणी प्रस्ताव शेतमाल विक्रीनंतर ३० दिवसांत आवश्यक त्या कागदपत्रांसह विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत.

१६. परराज्यात शेतमाल पाठवित असताना १ कन्साईनमेंट मध्ये शेतकरी उत्पादक कंपनी / संस्थेच्या किमान ३ उत्पादक शेतकरी सभासदांचा शेतमाल एकत्रितपणे पाठविणे आवश्यक राहील.

- **योजनेअंतर्गत अदा केलेले अनुदान:-**

सदर योजनेअंतर्गत शंभूनाथ ॲग्रो प्रोड्युसर कंपनी ली., ता. अर्धापुर, जि. नांदेड या शेतकरी उत्पादक कंपनीने पंजाब राज्यात पाठविलेल्या केळी या शेतमालाच्या वाहतूकीसाठी रक्कम रु.५०,०००/- अनुदान अदा करण्यात आले आहे.

# फ) तळेगाव शेती विभाग

कृषि पणन मंडळाच्या शेती विभाग,तळेगाव अंतर्गत १५० एकर जमिन क्षेत्र आहे. सदरचे क्षेत्र मुख्यफार्म व गिलबिल पट्टी असे दोन वेगवेगळया ठिकाणी असून मुख्यफार्म हे प्रक्षेत्र तळेगाव गाव भागास लागून असून गिलबिल पट्टी हे प्रक्षेत्र मुंबई – पुणे महामार्गास लागून आहे.

**गिलबिल पटटी प्रक्षेत्र तपशील :**

| अ.क्र | गिलबिल पटटी तपशिल | क्षेत्र (एकर) |
|---|---|---|
| अ) | राष्टीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था | २८.०० |
| ब) | निर्यात सुविधा केंद्र | ०१.०० |
| क) | फळबाग लागवडी खालील क्षेत्र (आंबा, पेरु, नारळ व आवळा) | १२.०० |
| ड) | नाला,रस्ते, इमारत व पडीक क्षेत्र | ०९.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **५०.००** |

**फळबाग -**

- सदर प्रक्षेत्रावरील फळबागचे व्यवस्थापन जानेवारी २०१९ पासून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था पाहत आहे.

**मुख्यफार्म प्रक्षेत्र तपशील :**

| अ.क्र | मुख्यफार्म तपशिल | क्षेत्र (एकर) |
|---|---|---|
| अ) | लागवडी योग्य क्षेत्र / कनव्हेशन सेंटर उभारणी | ३०.०० |
| ब) | तलावाखालील क्षेत्र (पाण्याचे क्षेत्र – अंदाजे २७ - २८ एकर) | ४१.०० |
| क) | मत्स्यतळी | ०१.०० |
| ड) | नाला, रस्ते, इमारत, पडीक क्षेत्र, मत्स्यतळी व न्यायालयीन बाब | २८.०० |
| | **एकुण क्षेत्र** | **१००.००** |

- मुख्यफार्म येथील संपुर्ण जमीनीस संरक्षण भिंतीचे बांधकाम चालू आहे.जमीनीची पुर्व,उत्तर-दक्षिण बाजूचे काम पुर्ण झालेले असून पश्चिम बाजूच्या (तलावभाग) भिंतीचे काम चालू आहे.
- मुख्यफार्म येथील जमीनीवर कन्वहेशन सेंटर उभारणी बांधकाम चालू करण्यात आलेले आहे. ड
- मुख्यफार्मवरील तलाव (४१ एकर) मच्छिमारीसाठी मावळ तालुका मच्छिमार को-ऑप सोसायटी, तळेगाव दाभाडे यांना तीन वर्ष करारावर देण्यात आलेला आहे. तलाव मच्छिमारीसाठी करारावर देणेबाबत निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.
- स.नं. ३४१/१ मोजणी फाळणी उतारा करुन घेणेबाबत भूमी अभिलेख कार्यालयाकडे पाठपुरावा चालू आहे.या विषयी तज्ञ सल्लागारची नेमणूक करण्यात येत आहे. या गटाव्यतिरिक्त संपुर्ण जमीनीची शासकीय मोजणी करुन घेण्यात आलेली आहे.

- स.नं २०१ व २०२ जमीन मालमत्ता सातबारा उता-यावर कृषि पणन मंडळाच्या नावाच्या नोंदीचे काम पुर्ण झाले आहे.
- मुख्यफार्म जमीन प्रक्षेत्रावर विविध ठिकाणी अतिक्रमण पायबंदीसाठी नोटीस बोर्ड लावण्यात आलेले आहेत तसेच जाहिर प्रकटनाचे फ्लेक्स लावण्यात आलेले आहेत.
- सदर जमीनी संबंधीत वि.सह.नि.सह.संस्था सहकार विभाग,पुणे , वडगाव मावळ न्यायालयातील व मुंबई उच्च न्यायालयातील दावे संदर्भातील कामकाज मुख्यालय ,पुणे यांचेशी समन्वय ठेवून चालू आहे.

*****